# मुंबई विद्यापीठ

प्रसिद्धी पत्रक

दिनांक- ३१ मार्च, २०१६

## विश्वकोश अद्ययावतीकरणासाठी मुंबई विद्यापीठाचा पुढाकार

### मुंबई विद्यापीठ आणि मराठी विश्वकोश मंडळ यांच्यात सामंजस्य करार

मुंबई – जगातील विविध विषयातील ज्ञान विश्वकोशाच्या सहाय्याने मराठीत आणण्यासाठी मराठी विश्वकोश मंडळ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यात आज सामंजस्य करार करण्यात आला.या करारान्वये मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी मुंबई विद्यापीठात दहा ज्ञानमंडळ स्थापन केले जाणार आहेत,ज्यामध्ये  अर्थशास्त्र, मानसशास्त्र, गणित व सांख्यिकी, वनस्पतिशास्त्र, जैवविविधता, जीवशास्त्र, भौतिकी, आधुनिक तत्वज्ञान आणि तत्वज्ञ आदि विषयांचा समावेश आहे.  या विषयांसाठी ज्ञानमंडळ म्हणून मुंबई विद्यापीठ जबाबदारी पार पाडणार आहे.याप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख ,दिलीप करंबेळकर,अध्यक्ष, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,सुवर्णा पवार,सचिव, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,डॉ.बाळ फोंडके,डॉ.नीरज हातेकर आणि प्रा.गौरी माहुलीकर हे उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या ध्येय धोरणानुसार विविध विद्यापीठांना ज्ञानमंडळाच्याद्वारे सहभागी करुन घेण्याकरीता विविध विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या २० खंडांची निर्मिती केली असून या २० खंडांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करणे,विविध विषयांवरील नव्या माहितीची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना करुन प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करुन ही सर्व ज्ञानमंडळे एकेमेकांशी जोडून त्या आधारावर विश्वकोशाची रचना करण्याच्या उद्देश्याने हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या योजनेच्या अनुषंगाने मराठी विश्वकोश खंड १ ते २० मधील नोंदींच्या अद्ययावतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कालबाह्य झालेल्या नोंदी निश्चित करणे,विद्यमान नोंदींचे पुनर्लेखन करणे,नव्या नोंदी लिहून घेणे आदी विविध विषयांचा समावेश असेल.हे प्राथमिक स्वरुपाचे काम झाल्यानंतर जगामध्ये प्रकाशित होणा-या माहितीच्या आधारे नोंदी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवणे याही कामाचा  अंतर्भाव असल्याने ज्ञानंमंडळाची स्थापना करुन प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळाची निर्मिती करुन ही सर्व ज्ञानमंडळे विश्वकोशाशी जोडली जाणार आहेत.त्यानुसार मुंबई विद्यापीठ अर्थशास्त्र, मानसशास्त्र, गणित व सांख्यिकी, वनस्पतिशास्त्र, जैवविविधता, जीवशास्त्र, भौतिकी, आधुनिक तत्वज्ञान आणि तत्वज्ञ या विषयांची पालकसंस्था म्हणून ज्ञानमंडळांची जबाबदारी पार पाडणार आहे.

ज्ञानमंडळाच्या रचनेमध्ये पाच तज्ज्ञांचे सल्लागार मंडळ व एक समन्वयक यांचा समावेश असेल. हे ज्ञानमंडळ महाराष्ट्रातील त्या विषयासंबंधातील लेखकांचा शोध त्यांच्या मदतीने नोंदींच्या लिखाणाचे व अद्ययावतीकरणाचे काम करेल. ही सर्व माहिती विश्वकोश मंडळाच्या संकेतस्थळावर वाचकांना उपलब्ध होईल. याद्वारे विविध विषयांवरील तज्ज्ञांची एक साखळी निर्माण होऊन तिच्याद्वारे सर्व विषयावरचे जागतिक ज्ञान मराठी भाषेत आणण्याची प्रक्रिया निरंतरपणे चालेल अशी अपेक्षा आहे. विश्वकोश मंडळातील विविध सदस्य त्यांच्याशी निगडित असलेल्या विषयांच्या ज्ञानमंडळाचे पालक म्हणुन काम करतील. विश्वकोशाचा हा उपक्रम यशस्वी होणार असल्याचा आशावाद कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी व्यक्त केला.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )